महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.२४-२५/ २९६७१
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
**दिनांक: १५.०९.२०२५**

# परिपत्रक

**विषय :** सन २०२३-२८ या कालावधी मधील वेतन पुनर्निधारण करारानुसार पगारवाढीच्या थकबाकीचा तिसरा हप्ता अदा करणेबाबत.

**संदर्भ** : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६७५, ६७६, ६७७ व ६७८ दि.१४.०८.२०२४.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.२४-२५/०८२२६ दि.१३.०३.२०२५.

*****

प्रशासकीय परिपत्रक क्र.६७५, ६७६, ६७७ व ६७८ दि.१४.०८.२०२४ अन्वये वेतन पुनर्निधारण करारानुसार देय असणाऱ्या पगारवाढीच्या अनुषंगाने विविध संवर्गांना देय सुधारित वेतनश्रेण्या व भत्ते लागू करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र.६७५ व ६७७ दि.१४.०८.२०२४ मधील परिच्छेद क्र.४(ख) नुसार दि.०१.०२.२०२४ ते दि.३१.०७.२०२४ या कालावधीतील थकबाकीचा तिसरा हप्ता कंपनीची आर्थिक स्थिती विचारात घेउन माहे सप्टेंबर-२०२५ मध्ये अदा करण्यात येईल अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने, सक्षम अधिकारी यांनी या कालावधीतील पगारवाढीच्या थकबाकीचा तिसरा हप्ता माहे सप्टेंबर-२०२५ च्या वेतनासोबत अदा करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

३. सबब, सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी सर्व नियमित कर्मचाऱ्यांना वरीलप्रमाणे थकबाकीची रक्कम माहे सप्टेंबर-२०२५ च्या वेतनासोबत अदा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सेवानिवृत्त/मयत/ राजीनामा दिलेले आणि सेवासमाप्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना देखील थकबाकीची रक्कम अदा करण्याकरीता माहे ऑक्टोबर-२०२५ मध्ये फरकाची गणना करून, एकूण निधीचे मागणीपत्र महाव्यवस्थापक (विवले), केंद्रीय देयके प्रणाली, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.